**कै.श्री.मु.ब.यंदे पुरस्कार**

**कल्पना एक आविष्कार अनेक २०१५ (वर्ष २९)**

महोदय

स.न.वि.वि

उपरोक्त संस्थेतर्फे “कल्पना एक आविष्कार अनेक”(वर्ष १२ वे) राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**प्राथमिक फेरी; शनिवार, २६ सप्टेंबर २०१५ (तालीम स्वरूपात)** घेण्यात येईल. जर अतिरिक्त प्रवेशिका वाढल्या, तर त्यांची प्राथमिक फेरी दोन गटात घेण्यात येईल. या संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार आयोजकांकडे राहील.

**स्पर्धेची अंतिम फेरी; शनिवार, ०३ ऑक्टोबर २०१५ रोजी दुपारी ०३:३० वाजल्यापासून NCPA-Experimental Theatre (नॅशनल सेन्टर ऑफ़ परफॉर्मिंग आर्ट्स - एक्सपेरिमेंटल थिएटर), सर दोराब टाटा रोड, एन.सी.पी.ए. मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०००२१ येथे आयोजित करण्यात येईल.**

**प्रवेश अर्जासोबत रु. ७५०/- (प्रवेश फी)**; **रविवार दिनांक २० सप्टेंबर २०१५** रोजी, दादर च्या **"क्षात्रैक्य समाज" वनमाळी हॉल, तिसरा मजला, छबिलदास शाळा समोर, दुपारी ०३:०० वाजल्यापासून सायंकाळी ०६:०० पर्यंतच स्वीकारले जातील.**

स्पर्धेचे ड्रॉ त्याच दिवशी सायंकाळी ०६:३० वाजता काढण्यात येतील. ड्रॉ साठी सदर स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी. सदर स्पर्धेत भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यात आपण निश्चितपणे सहकार्य कराल, असा विश्वास आहेच.

धन्यवाद !

आपला स्नेहाभिलाषी

**"अस्तित्व"**

**संपर्क : आयोजक**

**रवि मिश्रा : ९८२१०४४८६२**

**अस्तित्व : ९८२१५५३९४२**

स्पर्धेचे नियम :

- स्पर्धेची प्राथमिक फेरी; **शनिवार २६ सप्टेंबर २०१५ (तालीम स्वरूपात)**, **पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, दुसरा मजला, रिहर्सल हॉल, प्रभादेवी, मुंबई** येथे **सकाळी १०:०० वाजल्यापासून** आयोजित करण्यात येईल.

- स्पर्धेची अंतिम फेरी; **स्पर्धेची अंतिम फेरी; शनिवार, ०३ ऑक्टोबर २०१५ रोजी दुपारी ०३:३० वाजल्यापासून NCPA-Experimental Theatre (नॅशनल सेन्टर ऑफ़ परफॉर्मिंग आर्ट्स - एक्सपेरिमेंटल थिएटर), सर दोराब टाटा रोड, एन.सी.पी.ए. मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०००२१ येथे आयोजित करण्यात येईल.**

- प्रवेशअर्ज भरण्याची तारीख **रविवार दिनांक २० सप्टेंबर २०१४** असून; प्रवेश अर्जासोबत **रु.७५०/-** प्रवेश आकार आयोजक संस्थेकडे **शनिवार दिनांक २० सप्टेंबर २०१४** रोजी भरणे आवश्यक आहे. प्रवेश आकार कोणत्याही कारणास्तव परत दिला जाणार नाही.

- एकांकिका / संहिते ला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळाले असले पाहिजे. सदर प्रमाणपत्राची एक प्रत,एकांकिकेच्या दोन प्रती, लेखकाच्या परवानगीचे मूळपत्र अर्जासोबत देणे आवश्यक आहे.

- सादर करण्याची तारीख, क्रम व वेळ ड्रॉ पद्धतीने ठरविण्यात येईल. प्रवेश पत्रिका अपूर्ण असल्यास तिचा विचार केला जाणार नाही.

- स्पर्धा समिती ठरवेल त्या दिवशी, वेळी आणि क्रमानुसार, स्पर्धक संस्थेला आपला नाट्यप्रयोग विनातक्रार सादर करावा लागेल.

- एकांकिकेचा कालावधी किमान ३० मिनिटे व कमाल ४० मिनिटे असणे बंधनकारक राहिल. आधीच्या एकांकिकेचे नेपथ्य काढून प्रकाशयोजनेसाठी कमाल २० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.या नियमाचे पालन करण्यासाठी विशेषत: नेपथ्यकार व प्रकाशयोजनाकार यांनी विचार करावा अशी अपेक्षा आहे.

- सादर झालेल्या एकांकिकेचा यापूर्वी प्रयोग झाला होता अशी तक्रार आल्यास व चौकशी अंती असे आढळून आल्यास परीक्षकांच्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल.

- स्पर्धेच्या वेळेचे बंधन पाळणे प्रत्येक स्पर्धक संस्थेस बंधनकारक राहिल. स्पर्धक संस्थेने नियोजित सादरीकरणाच्या वेळेपूर्वी किमान ०१ तास आदी उपस्थित असणे बंधनकारक राहिल.


- प्राथमिक फेरी तालीम स्वरूपात होईल. अंतिम फेरीसाठी आयोजक संस्थेतर्फे **"विनामूल्य"** **८**FOH**+३**Left Bar**+३**Right Bar**+४**Backlight **(एकूण १८ स्थिर स्पॉट आणि २० पल्सर डिमर)** Amphi Theatre Set-up (बदामी प्रेक्षागृह आकारात) प्रेक्षागृहचा आराखडा पुढच्या पानावर जोडलेला आहे**.** स्पॉटचे लोकेशन बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही. नेपथ्यासाठी **० ६ ठोकळे, ४ प्लॅटफॉर्म, ०२ दरवाजे/ खिडक्या**, एकांकिकेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे.

- प्रेक्षागृहची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे **http://ncpamumbai.com/360exptheatre.html**
- सर्वसाधारण रंगभूषेसाठी (अंतिम फेरी) आयोजन संस्थेतर्फे मेकअप व्यवस्था करण्यात येईल. विशेष रंगभूषेची आवश्यकता असल्यास त्याचा खर्च स्पर्धक संस्थेला करावा लागेल.
- स्पर्धेचे आयोजन मुंबई विभाग फेरीसाठी मुंबईतच केले जाईल. मुंबई बाहेरील संस्था या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील परंतु मुंबई बाहेरीलच्या कोणत्याही संस्थेला प्रवासखर्च देण्यात येणार नाही.
- कोणताही स्पर्धक (दिग्दर्शक / अभिनेता / अभिनेत्री / तंत्रज्ञ) कलावंतास एकाच एकांकिकेसाठी स्पर्धेत सहभागी होण्याची अनुमती राहिल.
- एकांकिका स्पर्धेचे परीक्षक नेमण्याचा अधिकार आयोजक संस्थेस असेल. परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धक संस्थास बंधनकारक राहील.
- स्पर्धक संस्थांचे प्रतिनिधी व आयोजक संस्था यांची सभा **रविवार दिनांक २० सप्टेंबर २०१४ रोजी,** सायंकाळी ०६:३० वाजता, दादर च्या "क्षात्रैक्य समाज" वनमाळी हॉल, तिसरा मजला, छबिलदास शाळा समोर, येथे होईल. या सभेत सादरी करणाच्या तारीख, वेळ, क्रम ठरवण्यात येईल.
- एकांकिकेची संहिता पूर्णपणे नवीन असून या पूर्वी सदर संहितेचा / एकांकिकेचा कोठेही प्रयोग झालेला नसल्याचे लेखकाचे प्रमाणपत्र संहिते बरोबर देणे गरजेचे आहे.
- एकांकिका कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेली असावी. **रविवार दिनांक २० सप्टेंबर २०१४** पूर्वी संहितेच्या दोन प्रती आयोजकांकडे सादर करणे आवश्यक राहील. एकांकिकेच्या प्रती सादर करतांना सदर एकांकिका सेन्सॉर बोर्ड ऑफिसमध्ये प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सादर केल्याबद्दल प्राप्त रिसिटची छायाप्रत सादर करावी.
- एकांकिकेत / साहिंतेत विषय सूचक, आयोजक, अथवा कोणत्याही व्यक्तीचा, सामाजिक अथवा राजकिय संस्थेचा उलेख कटाक्षाने टाळण्यात यावा.
- कार्यक्रमात व नियमात फेरफार करण्याचा अधिकार स्पर्धा समितीकडे राहील. या संबंधी कोणतीही कारणे देण्यात येणार नाही.

# कल्पना एक आविष्कार अनेक २०१५ (वर्ष २९)


## अंतिम फेरी - रंगमंच रचना


http://ncpamumbai.com/360exptheatre.html











**For Saturday, 03rd October 2015 – Kalpana Ek Aawishkaar Anek Marathi One Act Play Competition**

## कल्पना एक आविष्कार अनेक २०१५ (वर्ष २९) (www.facebook.com/kalpana2015)

## कल्पना सूचक:ज्येष्ठ साहित्यिक गुलज़ार साहब

## कल्पना: अलाव...!

*रात भर सर्द हवा चलती रही*
*रात भर हमने अलाव तापा*
*मैंने माज़ी से कई ख़ुश्क सी शाख़ें काटीं*
*तुमने भी गुज़रे हुए लम्हों के पत्ते तोड़े*
*मैंने जेबों से निकालीं सभी सूखी नज़्में*
*तुमने भी हाथों से मुरझाए हुए ख़त खोले*
*अपनी इन आँखों से मैंने कई मांजे तोड़े*
*और हाथों से कई बासी लकीरें फेंकीं*
*तुमने पलकों पे नमी सूख गई थी सो गिरा दी*
*रात भर जो मिला उगते बदन पर हमको*
*काट के डाल दिया जलते अलाव में उसे*
*रात भर फूंकों से हर लौ को जगाये रखा*
*और दो जिस्मों के ईंधन को जलाये रखा*
*रात भर बुझते हुए रिश्ते को तापा हमने*



**I am sending you a poem 'Alav', which speaks of a cracked relationship. When I say 'cracked', I mean the relationship which broke away but never broken really. A separation is not really a 'break – up', in life. The threads keep hanging in-spite of a tear apart. Gulzar**

**शेकोटी**

एक नातं कुडकुडत होतं म्हणून, एका रात्रीची शेकोटी केली आपण
मी काही वाळलेले संदर्भ तोडले, तू ही बहर ओसरलेल्या क्षणांचा पाचोळा आणलास
मी खिशातून काही कोरड्या कविता काढल्या,
तू ही जीर्ण मायन्यांची काही पत्रं फाडलीस
मी डोळ्यांतून ओरबाडून काढले काही ऋतू आणि
फेकून दिल्या तळहाताला पारंब्यासारख्या लगडलेल्या काही रेषा
तू, मुळाशी ओल वाळत चालली होती म्हणून,
तोड्ल्यास काही पापण्या.
रात्रभर...उगवत्या देहांवर जे जे काही मिळालं आपल्याला
तोडून टाकत राहिलो आपण...रात्रीच्याच शेकोटीत
रात्रभर...फुंकर मारत एक एक ठिणगी जिवंत केली
आणि दोन देहातलं इंधन ज्वलंत ठेवलं
एका रात्रीची शेकोटी केली आपण एक ओळख उबदार रहावी म्हणून !

**मराठी रूपांतर वैभव जोशी**

**BONFIRE**

*The cold wind blew all night*
*And we warmed ourselves by the open fire*
*I cut some drying branches off the past*
*You too broke off the leaves of bygone moments*
*I cleaned out my pocket of all the lifeless poems*
*You too opened a bunch of faded missives*
*With my very eyes I severed a few strings, and*
*Threw out the many stale lines from my palms*
*You brushed off the dried moistness from your eyes*
*Whatever we found soar growing all night on our bodies*
*We lopped off and consigned to the flames*
*All night, our breath kept alive each flame*
*And the fuel inside our bodies*
*All night we warmed ourselves on a dying relationship.*

# प्रवेश अर्ज

- संस्थेचे / महाविद्यालयेचे नाव : ______________________________
- एकांकिकेचे  नाव : ______________________________
- लेखकाचे नाव : ______________________________
- दिग्दर्शकाचे नाव : ______________________________
- संस्था  प्रतिनिधीचे नाव : ______________________________
- दूरध्वनी क्रमांक : ______________________________
- डी.आर.एम. क्रमांक : ______________________________

प्राचार्य / संस्था अध्यक्ष
सही व शिक्का

आयोजक
अस्तित्व

| | |
|---|---|
| • प्रवेश अर्ज | |
| • संहितेची ०२ प्रती | |
| • सेन्सॉर बोर्ड ची प्रत | |
| • प्रवेश फी | |
| • लेखकाची परवानगी | |
| • कलाकारांची  यादी ०२ प्रती | |